बेस्ट उपक्रम व बेस्ट भविष्य निर्वाह निधी विश्वस्त संस्थेसाठी व्यावसायिक भविष्य निर्वाह निधी सल्लागार नियुक्त करण्यासाठी अर्ज मागविण्याची सूचना.

१. बेस्ट उपक्रमामध्ये व्यावसायिक भविष्य निर्वाह निधी सल्लागारांसाठी व्यक्ति किंवा संस्थेकडून नियुक्तीच्या तारखेपासून एक वर्ष कालावधीसाठी अर्ज मागविण्यात येत आहे.

२. पात्रता निकष.

२.१ अर्जदारास कुठल्याही संस्थेमध्ये जेथे ५,००० पेक्षा जास्त कामगार कार्यरत असतील तेथे कमीत कमी दहा वर्षे भविष्य निर्वाह निधी सल्लागार म्हणून काम करण्याचा अनुभव असला पाहिजे.

२.२ अर्जदारास कर्मचारीय भविष्य निर्वाह निधी व संकीर्ण तरतूदी कायदा, १९५२ याचे सखोल ज्ञान असणे आवश्यक आहे.

२.३ अर्जदारास कर्मचारीय भविष्य निर्वाह निधी संघटनेचा व त्याच्या क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यपध्दतीची पूर्ण माहिती असणे आवश्यक आहे.

२.४ अर्जदाराला केंद्रिय भविष्य निर्वाह निधी संघटनेने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या सूचनांबद्दल पूर्ण माहिती असणे आवश्यक आहे.

२.५ अर्जदाराला कर्मचारीय भविष्य निर्वाह निधी व संकीर्ण तरतूदी कायदा, १९५२च्या अंतर्गत येत असणा-या मुद्दयांबाबत काटेकोरपणे पाठपुरावा करण्याची क्षमता असली पाहिजे.

२.६ अर्जदाराला केंद्रिय भविष्य निर्वाह निधी संघटनेने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या सूचनांच्या अर्थासंबंधी पुरेसे ज्ञान व कौशल्य असणे आवश्यक आहे.

२.७ अर्जदारास केंद्रिय भविष्य निर्वाह निधी संघटना किंवा इतर कुठल्याही शासन संस्थेने अपात्र ठरविलेले नसावे.

३. निवडलेल्या सल्लागारास बेस्ट उपक्रम व बेस्ट भविष्य निर्वाह निधी, विश्वस्त संस्थेला कर्मचारीय भविष्य निर्वाह निधी व संकीर्ण तरतूदी कायदा, १९५२च्या अंतर्गत येणा-या सर्व बाबींबद्दल सहाय्य करावे लागेल.

४. कामाचे विधानार्थ स्वरुप खालीलप्रमाणे :-

४.१ दैनंदिन कामकाजात बेस्ट उपक्रम व बेस्ट भविष्य निर्वाह निधी विश्वस्त संस्थेला भविष्य निर्वाह निधी अंतर्गत मुद्दयांबद्दल सल्ला देणे.

४.२ उपक्रमाला भविष्य निर्वाह निधी कायदयाअंतर्गत तरतुदींचा लाभ मिळण्यासाठी मार्गदर्शन करणे.

४.३ उपक्रमाने आपल्या कामासाठी नियुक्त केलेल्या कंत्राटदाराकडून भविष्य निर्वाह निधी अंतर्गत वैधानिक देणींची पूर्तता कशी करुन घ्यावी याबद्दल उपक्रमास सल्ला देणे / मार्गदर्शन करणे.

४.४ क्षेत्रिय भविष्य निर्वाह निधी संस्थेबरोबर समन्वय साधून उपक्रमाच्या कर्मचा-यांना त्याचे फायदे उपलब्ध करुन देणे.

४.५ भविष्य निर्वाह निधी कायदयाअंतर्गत कोणतीही कारणे दाखवा नोटिस आल्यास त्यास उत्तर देण्यास मार्गदर्शन करणे.

४.६ क्षेत्रिय भविष्य निर्वाह निधी कार्यालयाशी निगडीत सर्व कामे.

४.७ देण्यात येणारे सल्ले, माहिती व मार्गदर्शन शक्यतो लिखित स्वरुपात असावेत.

५. उप. मुख्य लेखा अधिकारी यांच्या नांवे केलेले अर्ज सीलबंद पाकिटात भरुन दि. २५ फेब्रुवारी, २०२०, १४.०० वाजेपर्यंत उप. मुख्य लेखा अधिकारी यांच्या कार्यालयात, दुसरा मजला, परिवहन भवन, कुलाबा येथे जमा करावा.

५.१ अर्जांमध्ये खालील माहिती नमूद करावी.

५.१.१ व्यक्तीचे / संस्थेचे नांव

५.१.२ संस्थेचे स्वरुप : मालकी / भागीदारी / कंपनी

५.१.३ अर्जदाराचा संपूर्ण पत्ता व ई-मेल

५.१.४ अधिकृत व्यक्तीबरोबर संपर्क करण्यासाठी तपशील

५.१.५ अनुभव

५.१.६ मासिक / वार्षिक सल्लागार शुल्क

५.१.७ काही अतिरिक्त माहिती

६. सीलबंद प्राप्त झालेले अर्ज, अर्जदार किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधीने आपल्या इच्छेने हजर असेल त्यांच्या समोर दि. २५फेब्रुवारी, २०२० रोजी १४.३० वा. उघडण्यात येईल.

७. अर्जदाराने उल्लेखिलेल्या मासिक / वार्षिक शुल्क हे अर्ज उघडण्याच्या दिनांकापासून १८० दिवस पर्यंत स्वीकृतीसाठी वैध धरली जाईल.

८. बेस्ट उपक्रमाला कुठलाही अर्ज किंवा सर्व अर्ज (कोणतेही कारण न देता) नाकारण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार असेल. असे झाल्यावर अर्जदाराला कुठल्याही प्रकारचा दावा करण्याचा अधिकार नसेल.

९. अर्जदारास जर काही स्पष्टीकरण हवे असल्यास त्यांनी सहाय्यक प्रशासकीय व्यवस्थापक, भविष्य निर्वाह निधी, बेस्ट उपक्रम, परिवहन भवन, तिसरा मजला इलेक्ट्रिक हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई - ४०० ००१. ई-मेल bestpf@bestundertaking.com, दूरध्वनी क्र. ०२२-२२७९९४०० येथे संपर्क साधावा.